# गुणवत्तेवर स्वायत्तता देणार

## प्रकाश जावडेकर : गोखले इन्स्टिट्यूटमध्ये पदवी प्रदान सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क



गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेच्या पदवी प्रदान समारंभात पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. राजीव कुमार, प्रकाश जावडेकर व प्रा. राजस परचुरे.

**पुणे :** उच्च शिक्षणातील अधिकार मंडळे असलेल्या यूजीसी, एआयसीटी, एनसीटीई या संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात येणार असून, त्यांचे नियंत्रण कमी केले जाणार आहे. गुणवत्तेच्या आधारावर महाविद्यालयांना जास्तीत जास्त स्वायतत्ता दिली जाईल, असे केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांनी सोमवारी सांगितले.

गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेचा २४वा पदवी प्रदान समारंभ प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते पार पडला. या वेळी कुलपती डॉ. राजीव कुमार, कुलगुरू प्रा. राजस परचुरे उपस्थित होते.

प्रकाश जावडेकर म्हणाले, ''सद्य:स्थितीतील विषयांवर मोठ्या प्रमाणात संशोधन होणे आवश्यक आहे. नोटाबंदीनंतर झालेले बदल, स्वच्छतागृहांच्या उपलब्धतेमुळे घडून आलेले परिणाम, मेक इन इंडिया योजना, मुद्रा योजना यांवर तरुण अभ्यासकांनी संशोधन करून ते लोकांसमोर मांडले पाहिजेत. पाश्चिमात्य देशांतील केस स्टडींचा अभ्यास करण्याऐवजी आपल्या देशातील प्रश्नांवर संशोधन व्हायला हवे. केंद्र शासनाने संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी शालेय स्तरावर अटल किंकरींग लॅब सुरु केल्या आहेत. यामधून विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन दिले जाईल. त्याचबरोबर, इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी हॅकेथॉन ही स्पर्धा राबविली जात आहे. मागील वर्षी झालेल्या या स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी ४२ नावीन्यपूर्ण शोध लावले. यंदाच्या वर्षी या स्पर्धेत १ लाख इंजिनिअरिंग कॉलेज सहभाग घेण्याची शक्यता आहे.''

केंद्र शासनाकडून शिक्षणाचे नवीन धोरण तयार करण्यात येत आहे. जानेवारी २०१५पासून याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

या शिक्षण धोरणाचा मसुदा तयार करून त्यावर लोकांच्या सूचना व शिफारशी जाणून घेण्यात आल्या आहेत. याआधारे शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल केले जाणार आहेत. पाश्चिमात्य देशांतील तज्ज्ञांनी भारतामध्ये येऊन मार्गदर्शन करावे यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

अनेक विद्यापीठांमधील अभ्यासक्रम वर्षानुवर्षे बदलले जात नाहीत. त्यामध्ये सुधारणा केल्या जात आहेत. संशोधनासाठी पायाभूत सुविधा पुरविण्यात येणार आहेत, असे प्रकाश जावडेकर यांनी सांगितले.

### ५वी व ८वीसाठी परीक्षा घेणार

- विद्यार्थ्यांना शिकवलेले कितपत समजले आहे, यासाठी चाचणी घेण्यात येत आहे. त्याचबरोबर, ५वी व ८वीसाठी पुन्हा परीक्षा घेतल्या जाणार असल्याचे प्रकाश जावडेकर यांनी स्पष्ट केले.